ARTHA · Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. P. 3434. Licence No. 53.

वर्ष २२ | पुणें, बुधवार तारीख १९ डिसेंबर, १९५६ | अंक ४८


## विविध माहिती

**जव्हारला पाण्याचा पुरवठा**—पूर्वीच्या जव्हार संस्थानची राजधानी जव्हार ह्या शहराला पाणीपुरवठा करण्यासाठी ७ लाख रुपये खर्च येणारी योजना हातीं घेण्यांत आली आहे. ह्या ठिकाणीं दरसाल १५० इंच पाऊस पडूनहि उन्हाळ्यांत पाण्याचें दुर्भिक्ष भासतें. पाणी अडवण्यासाठी बांधावयाच्या धरणाचें प्राथमिक काम सुरू झालें आहे.

**बचत करण्याची मोहीम**—रत्नागिरी स्कूलबोर्डानें प्राथमिक शिक्षकांत अल्प बचतीच्या मोहिमेला प्रारंभ केला आहे. त्यांनीं आपल्या पगारांतून दरमहा ४ आणे बोर्डाकडे द्यावे अशी अपेक्षा करण्यांत येत आहे. रत्नागिरी जिल्ह्यांत ६,००० प्राथमिक शिक्षक आहेत त्यांनीं मनावर घेतलें तर दरसाल १८,००० रुपये नॅशनल प्लॅन सर्टिफिकेटसमध्यें गुंतवितां येतील.

**कलिंग पारितोषिकाचा मानकरी**—१९५६ सालचें कलिंग पारितोषक जॉर्ज गॅमो ह्यांना देण्यांत आलें आहे. जॉर्ज गॅमो हे पूर्वीं जॉर्ज वॉशिंग्टन विद्यापीठांत पदार्थ विज्ञान शास्त्राचे प्राध्यापक होते. हें पारितोषिक भारतीय उद्योगपति श्री. पटनायक ह्यांनीं सुरू केलेलें आहे. भारत व इतर देश ह्यांच्यांतील शास्त्रीय संबंध वाढविण्यासाठी तें देण्यांत येतें.

**भारतीय शेतकरी अमेरिकेस जाणार**—इंटर नॅशनल को-ऑपरेशन ॲड्मिनिस्ट्रेशनतर्फे १८ भारतीय शेतकऱ्यांचा एक संघ अमेरिकेंत जाऊन तेथील शेतीची अभ्यास करणार आहे. ह्या संघांत पूर्व खानदेश जिल्ह्यांतील सावदा येथें रहाणारे श्री. वसंतराव पाटील, बी. एससी. ह्यांचा समावेश करण्यांत आलला आहे. श्री. पाटील ह्यांना अखिल भारतीय द्राक्षांच्या प्रदर्शनांत पहिलें बक्षीस मिळालें आहे.

**आसाममधील तेलाचा कारखाना**—तेल शुद्ध करण्याचा नवा कारखाना काठ काढावा, हें ठरविण्यासाठी तद्विषयक तज्ज्ञांचें एक कमिशन नेमण्यांत आलें होतें. सदर कारखाना आसाममध्यें काढल्यास तें तांत्रिक दृष्ट्या इष्ट ठरेल व शिवाय आर्थिक दृष्ट्याहि फायद्याचें ठरेल असें मत त्यांनीं व्यक्त केलें आहे. कारखाना काढण्यांत आल्यास आसामला भारताच्या इतर भागांशीं जोडणारा दुहेरी रेल्वेमार्गहि बांधावा लागेल.

**५० हजार एकरांचें यांत्रिक शेत**—राजस्थानांतील सुरतगड ह्या ठिकाणीं ५०,००० एकरांचें, यांत्रिक अवजारें वापरणारें शेत गेल्या ऑगस्ट १५ पासून स्थापन करण्यांत आलें आहे. ह्या शेताला लागणारीं शेतीचीं अवजारें रशिआनें देणगीदाखल दिलेलीं आहेत. आतांपर्यंत ३,००० एकर जमीन यंत्रांच्या साह्यानें लागवडीखालीं आणण्यांत आली आहे.

**सुएझ कालव्याची सफाई**—सुएझचा कालवा पुन्हां चालू करण्यासाठी त्याच्या सफाईसंबंधीं प्राथमिक पहाणी करण्याकरितां डच व डॅनिश तज्ज्ञ इजिप्तला रवाना झाले आहेत. सफाईचें काम संयुक्त-राष्ट्र-संघटनेतर्फे करण्यांत, येणार आहे. त्याशिवाय बुडलेल्या बोटी वर काढण्यांत वाकबगार असलेले ३५ डच व ३० डॅनिश तंत्रज्ञहि तिकडे गेले आहेत.

**परदेशीय बौद्धांची यात्रा**—बुद्धाच्या २,५०० व्या जयंतीनिमित्त भारतांत बरेच परदेशीय बौद्ध भिक्षू आले होते. त्यांपैकी ६० भिक्षूनीं गया, राजगीर, नालंद व पाटणा येथील बुद्धविषयक महत्त्वाच्या ठिकाणांची यात्रा केली. गया येथें त्यांनीं महाबोधी देवळांत पूजाहि केली. ह्या भिक्षूंत जपान, चीन, अमेरिका, रशिआ, ब्रिटन, जर्मनी, पोलंड इत्यादि देशांतून आलेले लोक होते.

**वॉरसामध्यें भारताची वकिलात**—पोलंडची राजधानी वॉरसा येथें भारतानें स्वतंत्र वकिलात उघडण्याचें ठरविलें आहे. पोलंडमधील भारताचें कामकाज ह्यापूर्वीं रशिआमधील भारताचा वकीलच पहात असे. पूर्व युरोपमध्यें चालू असलेल्या घडामोडींची अधिक माहिती मिळावी म्हणून ही नवीन वकिलात उघडण्यांत येत आह.

**बोटी बांधण्याचा कारखाना**—भारतांत आणखी एक बोटी बांधण्याचा कारखाना काढण्यासाठी ब्रिटननें मदत देऊं केली आहे. कोलंबो योजनेला अनुसरून ह्या कारखान्यासंबंधीं प्राथमिक अहवाल तयार करण्यासाठी ब्रिटिश तज्ज्ञांचें एक मंडळ भारतांत येणार आहे. कारखान्याची जागा, त्याची बांधणी व त्यासाठी लागणारी यंत्रसामुग्री ह्यासंबंधीं भारतीय सरकारकडे आपला अहवाल मंडळ सादर करील.


तमाम दंतरोगांवर
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

**काश्मीरमधील हस्तव्यवसाय**— काश्मीरमधील हस्तव्यवसायांची संघटना करण्यासाठी स्वित्झरलंडमधील तज्ज्ञांना बोलावण्यांत येणार आहे. स्वित्झरलंड हा देश छोटया उद्योगधंद्यांबद्दल प्रसिद्ध आहे. अशा प्रकारच्या उद्योगधंद्यांची तेथील संघटना काश्मीरलाहि उपयोगी पडेल असा अंदाज करण्यांत आला आहे.

**भारतामधील परदेशीय नागरिक**—१ जानेवारी, १९५६ ह्या दिवशीं भारतामधील परकीय नागरिकांची संख्या ४४,५५७ होती अशी माहिती लोकसभेंत सांगण्यांत आली. सर्वांत अधिक परदेशीय नागरिक मुंबई राज्यांत होते. त्यांची संख्या १५,५८१ होती. मुंबईच्या खालोखाल पश्चिम बंगाल आणि बिहार ह्यांचा अनुक्रम लागतो.

**नवें आकाशवाणी केंद्र**—पाटण्यापासून १४ मैलांवर असलेल्या एका गांवीं बिहारसाठीं नवें आकाशवाणी केंद्र स्थापन करण्यांत आलें आहे. पाटण्याला असलेल्या पूर्वीच्या केंद्राची शक्ति ५ किलोवॅटची होती. नवें केंद्र २० किलोवॅट शक्तीचें आहे. तें उभारण्यासाठीं ९ लाख रुपये खर्च आला. आतां सर्व बिहार राज्याला ध्वनिक्षेपण नीट करतां येईल.

**दिल्ली ते लंडन स्वस्त प्रवास**—अफगाणिस्थानच्या विमान-वहातूक कंपनीनें दिल्ली तें लंडन हा प्रवास स्वस्त दरानें करतां येईल अशी जाहिरात केली आहे. पश्चिम आशिआंतील मार्गानें जाणाऱ्या इतर आंतरराष्ट्रीय विमान-कंपन्या हाच प्रवास १,४१४ रुपयांत करतात. अफगाण विमान कंपनीनें १,२१२ रुपये तिकिटाचा दर ठेवला आहे.

**नाट्यकलेला उत्तेजन**—नाट्यकलेला उत्तेजन देण्यासाठी म्हणून मुंबई सरकारनें १९५६-५७ सालांकरितां २·१६ लाख रुपयांची रक्कम मंजूर केली आहे. ह्या निधींतून मराठी व गुजराती भाषा बोलणाऱ्या भागांतील नाट्यकलेलाच फक्त मदत करण्यांत येणार आहे असें मुंबई सरकारनें जाहीर केलें आहे.

**मध्यप्रदेशांतील उद्योगधंदे**— मध्यप्रदेशांतील प्रत्येक जिल्ह्यांत कोणते उद्योगधंदे काढतां येण्यासारखे आहेत ह्यासंबंधी एक तपशीलवार पहाणी लवकरच करण्यांत येणार आहे. ही पहाणी झाल्यानंतर सर्व मध्यप्रदेशाच्या औद्योगिक विकासाची सुसंगत योजना तयार करण्याचें काम हातीं घेण्यांत येणार आहे.

**भारतीय मालाला मागणी**—झेकोस्लोव्हाकिआंतील एक औद्योगिक प्रतिनिधिमंडळ भारतांत आलें आहे. मंडळाच्या पुढाऱ्यानें अशी माहिती सांगितली कीं, भारतांत तयार करण्यांत आलेली हलकी यंत्रसामुग्री आणि हस्तव्यवसायांत तयार केलेला माल ह्यांना झेकोस्लोव्हाकिआंत भरपूर मागणी आहे. भारताला भारी यंत्रसामुग्री झेकोस्लोव्हाकिआ पुरवूं शकेल.

**विमानतळावर चित्रपट दाखविणार**— नागपूर येथील विमानतळावर रात्रीं प्रवास करणाऱ्या वैमानिक प्रवाशांसाठी अनुबोधपट व शैक्षणिक चित्रपट दाखविण्यांत येणार आहेत. त्यांचा वेळ मजेंत जावा म्हणून ही सोय करण्यांत येत आहे.

**केरळमधील खनिज संपत्ति**— त्रावणकोर-कोचीन राज्यांतील खनिज संपत्तीचा शोध करण्याचें काम भारतीय सरकारनें हातीं घेतलें आहे. कमी प्रतीची लोखंडाची माती, बेरिल, ग्रॅफाइटचा दगड व चिनी माती, इत्यादि खनिजांसाठीं राज्यांतील भूस्तरांची तपासणी करण्याचें काम चालू पंचवार्षिक कार्यक्रमांत हातीं घेण्यांत येईल.


# बँक ऑफ पूना लिमिटेड

( शेड्यूल्ड बँक )

—मुख्य कचेरी : ४५५ रविवार, पुणें २.—

—शाखा—

( १ ) २६१ सदाशिव, पुणें.
( २ ) ५४ डेक्कन जिमखाना, पुणें ४.
( ३ ) सोलापूर. ( ४ ) सांगली.

—:व्याजाचे दर:—

चालू ठेव-अर्धा टक्का. सेव्हिंग्ज-दोन टक्के.
२ महिन्यांच्या पुढें मुदतीच्या ठेवीवर तीन टक्के व्याज.

★ सांगली शाखा व मुख्य ऑफिसमध्यें मूल्यवान जिनसा सुरक्षित ठेवण्याकरितां अल्प भाड्यानें लॉकर मिळतील.



# दि बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना १९११

मुख्य कचेरी : ९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका शेतकरीवर्ग व सर्व प्रकारच्या सहकारी संस्था ह्यांच्याच उपयोगासाठीं दिला जातो.

| | | |
|---|---|---|
| भरपाई झालेलें भांडवल | | |
| भागीदारांतर्फे | रु. ३५,२३,७०० | |
| मुंबई सरकारतर्फे | रु. २६,००,००० | |
| | रु. | ६१,२३,७०० |
| गंगाजळी व फंड | रु. | ६१,८३,९०० |
| ठेवी | रु. | १०,७९,८८,००० |
| खेळतें भांडवल | रु. | १३,३५,२४,००० |

## १४ जिल्ह्यांमध्यें ६९ शाखा

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तींबद्दल चौकशी करावी.

वा. पुं. वैद्य
ऑनररी मॅनेजिंग डायरेक्टर.

# अर्थ

बुधवार, ता. १९ डिसेंबर, १९५६



संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## भारतापुढील आर्थिक समस्येचें निदान

भारताचे अमेरिकेंतील वकील श्री. जी. एल्. मेहता ह्यांनीं अमेरिकेंतील नॅशनल प्लॅनिंग असोसिएशनपुढें बोलतांना भारतापुढें असलेल्या आर्थिक समस्येचें विदारक निदान केलें आहे. श्री. मेहता म्हणाले कीं भारतीय सरकारनें व लोकांनीं पार पाडलेल्या पहिल्या पंचवार्षिक योजनेमुळें जनतेंत आत्मविश्वासाचें नवीन वारें वाहूं लागले आहेत. हा आत्मविश्वास खेड्यांत राहणाऱ्या ८० टक्के लोकांत उत्पन्न झाला आहे. तथापि, आर्थिक दृष्ट्या समाधानकारक अशा विकासाच्या पातळीवर येण्यासाठी भारताला १०० वर्षें थांबतां येणार नाहीं. जे लोक सुखी जीवनाचा, सत्तेचा व अधिकाराचा उपभोग घेत आहेत त्यांनीं इतर लोकांना सबूरीनें घेण्याचा सल्ला देणें ठीक आहे. पण ज्या दरिद्री लोकांना आपल्या मुलांना पुरेसें दूधसुद्धां देतां येत नाहीं त्यांनीं हा सल्ला मानणें ही गोष्ट अगदीं निराळी आहे. लोकशाही सरकारांनीं आपआपल्या देशांची आर्थिक उन्नति घडवून आणणें हें त्यांचें कामच आहे. आशिआंत नव्यानें उदयास आलेल्या लोकशाही राज्यांतून मतांचा अधिकार लाखों लोकांना प्रथमच मिळालेला आहे. त्यामुळें तर ह्या लक्षावधि लोकांच्या आर्थिक व सामाजिक परिस्थितींत लवकर सुधारणा घडवून आणण्याचें कार्य फारच महत्त्वाचें झालें आहे. पुढील पांच वर्षांच्या कालांत ८० लाख नव्या नोकऱ्या निर्माण करणें हें भारतापुढील मूलभूत कार्य आहे. त्या कार्यांत यश आलें तरच वाढत्या लोकसंख्येच्या प्रश्नाला उत्तर मिळेल. हुकूमशाही विचारांचा उगम व प्रचार होण्यास असंतोष आणि कुचंबणा ह्यासारखीं दुसरीं कारणें नाहींत. सुशिक्षित बेकारांच्या संख्येंत वाढ होणें ह्यासारखी दुसरी कोणती गोष्ट कुचंबणा करणारी असेल ?

## ब्रिटनला आर्थिक साह्य मिळालें

सुएझ कालव्याच्या राष्ट्रीयीकरणामुळें ब्रिटन आर्थिक संकटांत सांपडलें होतें. आंतरराष्ट्रीय देण्याघेण्याच्या व्यवहारांत पौंडाचा इतर परदेशीय चलनाशीं असणारा भाव घसरूं नये म्हणून ब्रिटिश सरकारनें इंटर–नॅशनल मॉनेटरी फंडाकडे मदत मागितली होती. ब्रिटनजवळील सोन्याची व डॉलर्सची गंगाजळी २०० कोटीच्याहि खालीं गेल्यामुळें ब्रिटनला हें साह्य मागावें लागलें. कारण तज्ज्ञांच्या मतानें इतकी गंगाजळी पौंडाच्या स्थैर्याच्या दृष्टीनें अगदीं आवश्यक आहे. इंटर–नॅशनल मॉनेटरी फंडानें ब्रिटनच्या विनंतीस अनुसरून १ अब्ज ३० कोटी डॉलर्सचें कर्ज मंजूर केलें आहे. ह्या रकमेपैकीं ५६ कोटी, १४ लक्ष, ७० हजार डॉलर्सची रक्कम ब्रिटनच्या चलनाच्या गंगाजळीसाठीं देण्यांत आली आहे. तीमुळें ब्रिटनला आपलीं देणींघेणीं भागवितां येतील. ह्या रकमेशिवाय ७३ कोटी, ८५ लाख, ३० हजार डॉलर्स देण्यांत आले आहेत. ह्या रकमेचा उपयोग ब्रिटनला येत्या १२ महिन्यांत केव्हांहि करतां येईल. फंडानें दिलेल्या मदतीचा उपयोग करून ब्रिटन पौंडाची सध्यांची किंमत टिकवून धरणार आहे. ह्या सर्व कर्जावर ब्रिटनला ३॥ टक्के व्याज द्यावें लागेल. तथापि व्याजाचा दर कमीअधिक करणें ब्रिटनकडून रक्कम कशी व केव्हां परत करण्यांत येईल त्यावर अवलंबून राहील. इंटर–नॅशनल मॉनेटरी फंडानें १९४७ व १९४८ सालीं ब्रिटनला ३० कोटी डॉलर्सचें कर्ज दिलेलें होतें. ब्रिटनची आर्थिक परिस्थिति जसजशी सुधारत गेली तसतशी वरील कर्जाची फेड करण्यांत आली. ब्रिटननें नव्यानें घेतलेलें कर्ज फेडण्यास किती अवधी लागेल हें पश्चिम आशिआंतील राजकीय परिस्थितीवर कांहीं अंशीं अवलंबून राहील.

## तंबाखूसाठीं परदेशीय बाजारपेठ

भारतीय तंबाखूसाठीं परदेशांत बाजारपेठ मिळविण्याचे प्रयत्न करण्यांत येत आहेत. हें काम करण्यासाठीं टोबॅको एक्सपोर्ट कमिशन कौन्सिलची स्थापना करण्यांत आली आहेच. ह्या विषयासंबंधीं लोकसभेंत झालेल्या प्रश्नोत्तरांवरून अधिक माहिती मिळाली आहे. लोकसभेचे एक सभासद श्री. रामराव ह्यांनीं आंध्रमध्यें सुमारें १ कोटी रुपये किंमतीची तंबाखू बाजारपेठेअभावीं पडून असल्याची वार्ता सरकारला ठाऊक आहे काय, असा प्रश्न विचारला होता. त्याला उत्तर देतांना व्यापारमंत्री श्री. डी. पी. करमरकर म्हणाले कीं, आंध्रमध्यें कांहीं प्रमाणांत तंबाखू गिऱ्हाइकांविना पडून होती हें खरें आहे. आंध्रमधील २,००० टन तंबाखूला रशिआकडून मागणी आली आहे आणि ती पुरविण्यासाठीं कराराहि करण्यांत आला आहे. भारताची स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशन व रशिअन सरकारची तंबाखू कंपनी ह्यांच्यामध्यें हा करार झाला आहे. इतर देशांतूनहि भारतीय तंबाखूला गिऱ्हाईक मिळविण्याचे प्रयत्न चालू आहेत. झेकोस्लोव्हाकिअन् सरकारच्या तंबाखू कंपनीनें १५० टन तंबाखू नमुन्यादाखल घेण्याचें कबूल केलें आहे. ही तंबाखू झेक कंपनीला पसंत पडली तर १९५७ व १९५८ सालीं अधिक तंबाखू विकली जाण्याचा संभव आहे. तंबाखूची निर्यात वाढविण्यासाठीं स्थापन करण्यांत आलेलें कौन्सिल आपल्या मार्गानें प्रयत्न करीत आहेच. परदेशांत व्यापारी प्रतिनिधि पाठविणें, प्रदर्शनांत माल मांडणें, इत्यादि उपायांचा अवलंब कौन्सिल करीत आहे. इजिप्तमध्यें भारतीय तंबाखूविषयीं माहिती प्रसृत करण्यांत आली असून ह्या प्रयत्नाला थोड्याफार प्रमाणांत यश येईल असें दिसत आहे.

## मोटारींवरील नव्या कराला विरोध

भारतीय सरकारनें मोटारींवर नुकताच जो अबकारी कर जाहीर केला आहे त्याला वेस्टर्न इंडिआ ऑटोमोबाइल असोसिएशनचे अध्यक्ष, श्री. एम्. बी. माडगांवकर, ह्यांनीं विरोध व्यक्त केला आहे. ह्यासंबंधीं काढलेल्या पत्रकांत श्री. माडगांवकर म्हणतात कीं, अर्थमंत्र्यांनीं भारतांत तयार करण्यांत आलेल्या प्रत्येक मोठ्या मोटारीवर ३,००० रुपये कर बसविला आहे. मोटारी वापरणाऱ्या लोकांना त्यामुळें जबर धक्का बसला आहे.

सध्यांचें युग हें जलद प्रवास करण्याचें आहे. तेव्हां मोटारीला चैनीची वस्तु असें म्हणतां यावयाच नाहीं. खरोखर ती एक जरूरीचीच वस्तु आहे. ह्या कराचें समर्थन करतांना अर्थमंत्र्यांनीं असा युक्तिवाद केला आहे कीं, करामुळें फक्त श्रीमंतांवरच परिणाम होईल. पण हा युक्तिवाद पोकळ आहे. ज्या माणसाला मधून मधून मोटारीनें लांबचा प्रवास करावा लागतो त्याला भारी अश्वशक्ति असलेली मोठी मोटारच उपयोगी पडते; छोटी नाहीं. मोटारसायकला व स्कूटर्स ह्यांच्यावर बसविण्यांत आलेल्या आयात कराचा भार मध्यमवर्गाला सोसावा लागणार आहे. तीं वाहनें तरी श्रीमंत लोक खासच वापरीत नाहींत. अर्थात्च ती चैनीची वस्तु ह्या सदरांत पडणं शक्यच नाहीं. भारतामधील मोटारी तयार करण्याचा धंदा आणि त्याचा विकास ह्या दृष्टीनें विचार करतां तर मोटारींवरील अबकारी कर निरुत्साह करणारा आहे. मोटारीच्या धंद्यासंबंधीं टॅरिफ कमिशननें नुकतीच पहाणी केलेली आहे. ह्या धंद्याला शक्य त्या सर्व सवलती व मदत ह्यांची जरूरी असतांनाच हा कर बसविण्यांत यावा, हें दुर्दैव आहे. त्यामुळ ह्या धंद्याचे पाय मागें ओढल्यासारखें होईल.

---

## इंडियन एअरलाइन्स कॉर्पोरेशनचा १९५५–५६ चा वार्षिक अहवाल

इंडियन एअरलाइन्स कॉर्पोरेशनमध्यें आठ विमान कंपन्या सामील झालेल्या होत्या. त्यांची कार्यपद्धति व नोकरीविषयक अटी अगदीं भिन्न होत्या. या एकत्रीकरणामुळें पर्वी निर्माण झालेले प्रश्न संपुष्टांत येत असून कार्यांत सुव्यवस्था निर्माण झाली असल्याचें सदर कॉर्पोरेशनच्या १९५५–१९५६ च्या वार्षिक अहवालावरून समजून येतें. १९५५–५६ मध्यें या कॉर्पोरेशनच्या विमानांनीं ५,००,२६६ उतारू, ५३,८५६ टन माल आणि ४,९९७ टन टपाल यांची वहातूक केली. त्यामागील वर्षाचे हेच आंकडे अनुक्रमें ४,७७,५८३ उतारू, ५०,२५६ टन माल आणि ४,६५९ टन टपाल असें होतें. कॉर्पोरेशनचें उत्पन्न १९५४–५५ मध्यें ६,९२,४६,६७१ रु. होतें, तें १९५५–५६ मध्यें वाढून ८,०८,६०,४१६ रुपयांवर गेलें., खर्चहि या मुदतींत ७,८२,६२,००३ रु. वरून वाढून ९,२८,००,४५१ रु.-वर गेला.

कॉर्पोरेशनच्या विमानांत आणखी भर पडून ती संख्या ९२ झाली. पुनर्विलोकनाच्या मुदतींत ८ हेरॉन्स आाण ३ स्कायमास्टर्स विमानें खरेदी करण्यांत आलीं. कॉर्पोरेशननें हिशोबाची समान पद्धति चालू केली असून त्यामुळ नोकरवर्गाच्या हिशोबांत फेरफार करावे लागले व पगार बिलांत विशेष वाढ झाली. खर्चांत काटकसर साधावी व त्यावर नियंत्रण ठेवावें म्हणून खात्यांतच हिशोबतपासणी विभाग व मध्यवर्ति खरेदी संघटना स्थापन करण्यांत आला. अशा उपाययोजनांमुळें कॉर्पोरेशनला खर्चांत बरीच बचत करतां आली. १९५५–५६ च्या अर्थसंकल्पांत संभाव्य तोटा १६१·८५ लक्ष रु. धरला होता. पण प्रत्यक्षांत तो ११९·४ लक्ष रु. झाला. या रकमेंत ५९·०१ लक्ष रु. च्या घसारा निधीचाहि समावेश आहे. म्हणून रोख तोटा अवघा ६०·३९ लक्ष रु. च झाला. त्या मागील वर्षापेक्षा सदर वर्षांतील तोटा २९·२५ लक्ष रु. नीं अधिक आहे. तथापि, सदर वर्षांत पगारबिलांत झालेली वाढ आणि पूरक वाहतक व्यवस्थेपायीं प्रत्यक्ष कामकाजांत आलेला तोटा, यासारख्या अनुषंगिक बाबीहि विचारांत घेतल्या पाहिजेत.


स्थापना १९३६

**युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा**

[ शेड्यूल्ड बँक ]

हेड ऑफिस—*पॅलेस स्ट्रीट, चिरमुले निकेतन, सातारा.*

शाखा–मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नासिक, बार्शी, लोणंद, कोल्हापूर व हलकर्णी

ता. ३१-३-५६ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ६,५०,००० |
| रिझर्व व इतर फंडस् | रु. | २,२८,००० |
| ठेवी व इतर फंडस् | रु. | १,१२,८०,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | १,१०,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष | दोन वर्षें | तीन वर्षें | ५ वर्षें |
|---|---|---|---|
| रु. २-८-० | रु. २-१२-० | रु. ३-०-० | रु. ३-८-० |

दहा अगर अधिक वर्षें रु. ४-०-० (चार फक्त)

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १-८-० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | " | १-०-० |
| चालू डिपॉझिट | " | ०-८-० |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर.

शं. ह. साठे, बी. ए., एलूएल्. बी., चेअरमन



# दि सांगली बँक लि.

**सांगली.**

स्थापना १९१६ : शेड्यूल्ड बँक

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ४,५०,००० |
| रिझर्व्हस् व इतर फंडस् | रु. | ६,२५,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | १,५०,००,००० |

: शाखा :

रबकवी, तेरदळ, कवठें महांकाळ, शिरहट्टी, विलिंग्डन कॉलेज, मंगळवेढा, शहापूर, उगार, इचलकरंजी, कराड, कोल्हापूर व मुंबई.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

मॅनेजर.

# पुढें उघड दिसत असलेलें स्थित्यंतर शांततामय कसें होईल ?

## धनिकांना प्रा. गाडगीळ ह्यांचा इषारा

( महाराष्ट्र व्यापारी व औद्योगिक परिषदेंतील भाषण )

एखादें क्षेत्र थोड्या व्यक्तींच्या हातांत राहिल्यास इतर कांहीं नियंत्रण केलें तरी त्या क्षेत्रांत कार्य करण्याची संधि मिळण्याचे जे आनुषंगिक फायदे असतात ते सुर्व कांहीं विवक्षित गटांतच मर्यादित राहतात. आणि जेवढ्या प्रमाणांत हें क्षेत्र महत्त्वाचें, तेवढ्या प्रमाणांत ही स्थिति समाजदृष्ट्या गैरफायद्याची. विद्याव्यासंग किंवा शिपाईगिरी या कूळ, गोत व प्रदेश इत्यादिकांवर अवलंबून नसाव्या हें तत्त्व आतां आपण स्वीकारलें आहे; व त्यास अनुसरून धोरण ठरवून त्याची अंमलबजावणी सुरू केली आहे. सर्व प्रमुख आर्थिक क्षेत्रांतहि ही विचारसरणी स्वीकारणें अवश्य आहे. पिढीजाद वळण व संपत्ति यांमुळें यांत आलेली व टिकलेली आजची अल्पाधिकारी अवस्था उघड दिसत आहे. निरनिराळ्या प्रदेशांतील कमीअधिक शिकलेल्या तरुणांस कशा प्रकारच्या क्षेत्रांत प्रवेश करून घेतां येतो याचा तौलनिक विचार केल्यास सद्यःस्थितीचें स्वरूप लक्षांत येईल.

मोठे व छोटे हा भेद सरकारी धोरणाबाबत महत्त्वाचा आहे. मोठे व्यापतात तीं क्षेत्रें राष्ट्रीय आर्थिक जीवनदृष्ट्या महत्त्वाचीं म्हणून त्यांवर सार्वजनिक सत्ता प्रस्थापणें आवश्यक आहे; तीं विशेष किफायतशीर म्हणून त्यांतील जादा नफ्याचा विनियोगहि शासनसंस्थेनें नियंत्रित करणें आवश्यक आहे. हिंदुस्थानच्या विशिष्ट परिस्थितींत हे सर्व मोठे अल्पसंख्य व अत्यंत मर्यादित गटांतील; तेव्हां सर्व महत्त्वाच्या क्षेत्रांत बहुसंख्याकांस काम करण्याची संधि मिळण्याच्या दृष्टीनेंहि या क्षेत्रावर सरकारी पगडा बसणें जरुरीचें आहे. या सर्व गोष्टी समाजवादी समाजरचनेचें ध्येय स्वीकारल्यामुळें विशेषच आवश्यक ठरतात, म्हणून मोठ्यांचा याबाबत तीव्र मतभेद असणें साहजिक आहे.

### मोठ्यांना सूचना

मला या प्रकरणीं मोठ्यांनाहि एक सूचना अत्यंत नम्रपणें करावीशी वाटते. सरकारी धोरणाच्या केवळ घोषणेमुळें त्यांजवर खरोखर कोणताहि परिणाम झालेला नाहीं. त्यांच्या कार्याचें व सत्तेचें क्षेत्र गेल्या ८–१० वर्षांत संकोचलें नाहीं, विस्तारलेंच आहे. यापुढील विकासयोजनेंतील कार्यक्रम एवढा मोठा आहे कीं, त्यांच्या कर्तबगारीला आणखी अनेक वर्षे पूर्ण वाव राहणार आहे. नियंत्रण क्वचित् वाढेल, नफा कांहींसा कदाचित् कमी होईल, एखादें क्षेत्र हातचें जाईल; तरी परिणामीं संपत्ति, सत्ता, कर्तृत्व यांत कोठेंच हल्लींपेक्षा फारसा फरक पडणार नाहीं. नवीन युगाच्या खुणा ओळखून त्यांनीं जर त्याप्रमाणें वागण्यास सुरुवात केली तर हें सर्व निश्चित घडून येईल. विशेषेंकरून दोन गोष्टी त्यांजकडून अपेक्षित आहेत. एक तर समाजहितपोषक सर्व नियंत्रणाच्या बाबतींत सरकारशीं त्यांचा पूर्ण सहकार दिसून यावा. कर देणें, नियंत्रणें पाळणें, इत्यादीं बाबत त्यांचेकडून जितकें काटेकोर वर्तन होईल तितकी देशाची प्रगति वेगानें होईल व समाजांतील त्यांचेबाबतची सद्भावना वाढेल.

दुसरें असें कीं, इतरांस मदत करण्याच्या, पुढें आणण्याच्या सार्वजनिक धोरणास त्यांचा विरोध न भासावा. याबाबतचें एक उदाहरण देऊन मी आपला आशय थोडक्यांत स्पष्ट करतों. गेल्या दोनतीन वर्षांत नवीन साखरकारखाने काढावयाचे ते शक्यतोंवर सहकारी तत्त्वावर, शेतकऱ्यांनीं चालविलेले काढावयाचे असें सरकारनें धोरण ठरविलें. हें धोरण ठरविण्यांत व धडाडीनें पुरस्कारण्यांत मुंबई राज्यसरकारनें विशेष स्पृहणीय कामगिरी केली आहे. या धोरणामुळें आजच्या साखरकारखानदारांना वाईट वाटावें, आपल्या क्षेत्रांत नवीन वांटेकरी उत्पन्न झाला याबद्दल खेद व्हावा हें स्वाभाविक आहे. परंतु जर त्यांनीं थोडासा विचार केला असता तर आजवर महाराष्ट्रांतील काळव्यांचा मुख्यतः आपणांसच कसा फायदा मिळाला, आपण कुठल्याशे कोठें आलों, आपली संपत्ति या कारखानदारींतून वाढून आपलें सर्वच क्षेत्र कसें विस्तारलें हें मनांत आणून झालें तेवढ्यावर समाधान मानून, स्थानिक शेतकऱ्यांच्या व त्यांच्या समाजाच्या उत्कर्षास प्रत्यक्ष मदत न केली तर निदान आशीर्वाद देऊन चांगुलपणा संपादला असता. कांहीं नाहीं तर निदान तटस्थता स्वीकारतां आली असती. यांतील कांहीं न करतां सर्व प्रकारच्या मार्गांनीं त्यांनीं या राष्ट्रहितैषी उपक्रमास विरोध सुरू केला. बरें, यांतहि कांहीं मर्यादा पाळावी. खाजगी कारखाने एकमेकांच्या किती जवळ आपण स्थापले हें उघड दृश्य डोळ्याआड करून सहकारी कारखाने मात्र खाजगी कारखान्यांच्या अमुक मैलांच्या आंत स्थापूं नयेत अशी मागणी केली, आम्ही स्वतःच्या क्षेत्रांतील उसावरच अवलंबून असून आमचा शेतकऱ्यांच्या उसाशीं संबंध नाहीं, असें उसाचा भाव ठरविण्याच्या वाटाघाटींत आपणच आग्रहानें सांगितलेलें न स्मरून आम्हांस शेतकऱ्यांचें क्षेत्र तोडून द्या असा दावा मांडला. सगळ्यांत मौज म्हणजे दोन सहकारी कारखाने जेमतेम चालू होतात न होतात तोंच एक कारखाना कांहीं वर्षे बरा चालला तो दैववशात् व दुसरा ज्याअर्थी पहिल्या वर्षी दोन महिने चालल्यावर त्याला फायदा झाला नाहीं त्याअर्थी सहकारी साखरकारखाने तोट्याचे समजून सरकारनें आपलें याबाबतचें धोरण बदलावें असें अधिकृतरीत्या बोलूं लागले.

### वर्गकलह सत्ताधाऱ्यांच्या वर्तनानेंच अधिक वाढतो !

मला यावर एवढेंच म्हणावयाचें आहे कीं, धनवानानें कांहींहि बोललेलें चालतें हें जरी खरें असलें तरी जास्त विवेकानें बोललें तर सर्वांसच केव्हांहि बरें. शेतकऱ्यास किंवा त्याच्या साहाय्यकांस पिढीजाद व्यवहाराचें वळण नाहीं, त्यांचे लागेबांधे नाहींत, बाजार वळविण्याचें सामर्थ्य वा कसब त्यांच्या अंगीं नाहीं, त्याअर्थी सहकारी कारखाना बरा चालला तर देवानें हात दिला म्हणूनच चालला, चालकांनीं त्यावर फुशारून जाण्याचें कारण नाहीं. हा इशारा मी स्वतः पूर्णपणें स्वीकारतों व त्याबद्दल धन्यवादहि देतों. पण अशा परिस्थितींत आपलें कर्तव्य काय हें विचारण्यास हरकत आहे काय ? तुम्ही अडाण्याची, गरिबाची हेटाळणी व अडवणूक करणार कीं त्यास आपला कारखाना चालविण्यास मदत करणार ? सरकारी धोरणाचा विवेकानें अभ्यास करणार कीं कारण असो वा नसो दर वेळेस त्यास उघड विरोध करून बुद्ध्या गैरसमज उत्पन्न करण्याचा प्रयत्न करणार ? वर्गकलह वाढतो तो चळवळ्यांच्या भाषणांपेक्षा सत्ताधाऱ्यांच्या वर्तनानें अधिक वाढतो, हें ऐतिहासिक सत्य आहे. हें आपल्यांतील मोठ्यांनीं लक्षांत धरल्यास पुढें उघड दिसत असलेलें स्थित्यंतर शांततामय होऊं शकेल अशी माझी खात्री आहे.

---

**भारतीय तंबाखूला मागणी**—रशियानें गुंटुर जिल्ह्यांत पिकणाऱ्या २,००० टन व्हर्जिनिया जातीच्या तंबाखूची मागणी केली आहे. हा व्यवहार स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशनमार्फत व्हावयाचा असून त्याप्रमाणें टोबॅको एक्सपोर्ट प्रमोशन कौन्सिलकडे कॉर्पोरेशननें मागणी कळविली आहे.

## कांचेच्या कारखान्याची तज्ज्ञांकडून पाहणी

भारतीय सरकारच्या विनंतीवरून मि. वेस्ट-ऑरॅम हे कांचेच्या धंद्याचे ब्रिटिश तज्ज्ञ देशांत आले होते. त्यांनीं भारतामधील कांचेच्या कारखान्यांची पहाणी करण्यासाठी १० आठवड्यांचा दौरा काढला होता. आतां ते आपला अहवाल सरकारला सादर करतील. कलकत्ता येथें ग्लास मॅन्युफॅक्चरर्स फेडरेशन ह्या संस्थेपुढें त्यांनीं केलेल्या आपल्या भाषणांत पुढील विचार व्यक्त केले आहेत. ते म्हणाले कीं भारतामधील कांच-कारखान्याच्या संघटनेंत एक फार मोठा दोष आहे. बहुतेक सर्व कारखान्यांतून उत्तम दर्जाचा माल काढण्यावर जोर देण्याऐवजीं माल स्वस्त कसा काढतां येईल इकडे अधिक लक्ष पुरविण्यांत येतें. हाच तो दोष होय. म्हणून कारखान्याच्या चालकांनीं मालाचा दर्जा चांगला करण्याची जाणीव ठेवणें आवश्यक आहे. कांच कारखान्यांनीं आपल्या मालाची प्रत वाढवावी म्हणून दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत त्या कारखान्यांना मदत देण्याची व्यवस्था भारतीय सरकारनें केली आहे. सध्यां कांचेचा उद्योग-धंदा कुटीरोद्योगासारखा मानण्यांत येत आहे. तसें करून चालणार नाहीं. हा धंदा पोलादाच्या धंद्याइतकाच महत्त्वाचा आहे असें मानण्यांत आलें पाहिजे.

कांचेच्या उद्योगधंद्याच्या प्रगतीला आणखीहि एक अडथळा आहे. भारतांत कमी किंमतीच्या कांचेच्या सामानाला बरीच मोठी बाजारपेठ उपलब्ध आहे. अशा बाजारपेठेंत मालाच्या दर्जाला फारशी किंमत देण्यांत येत नाहीं. त्यामुळें कमी किंमतीचा व बेताच्या दर्जाचा माल उत्पन्न करण्याकडे प्रवृत्ति होते. कारखान्यांत वापरण्यांत येणाऱ्या भट्ट्या व इतर उपकरणें जुनींपुराणीं असतात. त्यामुळें मालाचा दर्जा चांगला असत नाहीं आणि उत्पादन करतांना नुकसानहि बरेंच होतें. तथापि कांचकारखान्यांतून अधिक कार्यक्षम भट्ट्या वापरण्याकडे हल्लीं प्रवृत्ति दिसून येऊं लागली आहे. ज्या कारखान्यांनीं स्वयंचलित यंत्रसामुग्री बसविली आहे ते आपले काम यशस्वीपणें करीत असून विस्ताराच्या योजनाहि हातीं घेत आहेत. कारखान्यांना तांत्रिक ज्ञान असलेल्या कामगारांची वाण भासत आहे. त्याचप्रमाणें जरूर त्या प्रकारची वाळू निश्चितपणें होत रहाण्याची व्यवस्थाहि तांतडीनें करणें आवश्यक आहे. वाळूशिवाय इतर कच्च्या मालाच्या पुरवठ्याचीहि अशीच व्यवस्था करणें अगत्याचें आहे. कारखान्यांसाठीं कोळसा व जळणाचीं तेलें ह्यांचा पुरवठा आवश्यक असतो. ह्या सर्व बाबतींत सरकारनें साह्य करावें अशी शिफारस मी आपल्या अहवालांत करणार आहें. ह्या उद्योगधंद्यांत एकूण सुमारें १० कोटी रुपयांचें भांडवल गुंतलेलें असून ४०,००० कामगार रोजगारासाठीं त्यावर अवलंबून आहेत. इतकें असूनहि कांचकारखान्यांपैकी पुष्कळ कारखाने ग्रामोद्योगाच्या पातळीवर चालविले जात आहेत.

---

**डी. डी. टी. चा नवा कारखाना**—केरळ राज्यांत अल्वाये येथें डी. डी. टी. निर्माण करणारा नवा कारखाना काढण्याचे कामास प्रारंभ झाला आहे. कारखान्याच्या उभारणीचें काम एका अमेरिकन कंपनीकडे सोंपविण्यांत आलें आहे. प्रत्यक्ष उत्पादनास १९५८ सालीं प्रारंभ होईल. भांडवल म्हणून ८० लाख रुपये लागतील व दरसाल १४०० टन डी. डी. टी. तयार होईल.

## रबराच्या मळेवाल्यांची चिंता

उत्तर भारतांत कृत्रिम रबर तयार करण्याचा एक कारखाना काढण्याचें भारतीय सरकारनें उत्तर-प्रदेश सरकारच्या विचारानें ठरविलें आहे. सरकारच्या ह्या निर्णयामुळें दक्षिण केरळमधील रबराच्या मळेवाल्यांना चिंता वाटूं लागली आहे. 'प्लँटिंग अँड कॉमर्स' ह्या नियतकालिकाच्या माहितीप्रमाणें, भारतामध्यें होणाऱ्या रबराच्या उत्पादनापैकीं ९१ टक्के उत्पादन केवळ त्या राज्यांत होतें. कृत्रिम रबराच्या कारखान्याच्या स्थापनेनें नैसर्गिक रबराच्या धंद्यास धोका उत्पन्न होईल अशी भीति मळेवाल्यांना वाटत असल्यानें त्यांनीं भारतीय सरकारकडे एक निवेदन पाठविलें आहे. मळेवाल्यांच्या प्रातिनिधिक संघटनेनें पाठविलेल्या वरील निवेदनांत म्हटलें आहे कीं भारतामधील रबराचें उत्पादन सध्यां २३,००० टन आहे. देशाची गरज भागविण्यासाठीं ५,००० टन रबराची आयात करावी लागते. नियोजन समितीनें केलेल्या अंदाजाप्रमाणें १९६० च्या सुमारास भारताला ४०,००० टन रबर लागेल. म्हणजे सध्यांच्या उत्पादनापेक्षा १७,००० टन अधिक रबराची गरज लागेल. ही वाढती गरज भागविण्याचें सामर्थ्य रबराच्या धंद्यांत आहे ह्याविषयीं शंका घेण्याचें कारण नाहीं. अलीकडे रबराखालीं असलेल्या लागवडीखालील जमिनींत वाढ होत आहे. १९४३ ते १९४५ ह्या कालांत ४०,००० एकर जमिनींत रबराची लागवड नव्यानें करण्यांत आली. १९५६ सालीं आणखी २०,००० एकर जमिनींत रबराची लागवड झालेली आहे. शिवाय रबरबोर्डानें १ लाख एकर जमिनींत रबराची लागवड करण्याची योजना आखली आहे. नवीन लागवडीचें क्षेत्र लक्षांत घेतां, भारतामधील रबराचे मळे आणखी २५,००० टन रबर निर्माण करूं शकतील.

---

**भारतीय पोलो संघाचा दौरा**—इंडिअन पोलो असोसिएशननें पुढील वर्षी एका भारतीय पोलो संघाचा दौरा इंग्लंडमध्यें करण्याचें ठरविलें आहे. संघ इंग्लंडमध्यें बरेच सामने खेळेल. भारतीय सरकारनें संघाला मदत म्हणून ३५,००० रुपये देऊं केले आहेत. असोसिएशननें सुमारें २०,००० रुपये गोळा केले आहेत.

**जिनांचें मुंबईतील निवासस्थान**—मुंबई मलबार हिलवर असलेला बॅरिस्टर जिनांचा भव्य बंगला भारतीय सरकार आपल्या ताब्यांत घेणार आहे. हा बंगला विकत घेण्याची तयारी पाकिस्ताननें दाखविली होती. पण भारतीय सरकारनें तो विकण्यांत येणार नाहीं असें कळविलें आहे.


मराठी भाषिक सर्वसामान्य जनतेच्या उपयोगाकरितां

**नवा हिंदु वारसा कायदा**

**( १९५६ चा )**

लेखक : विठ्ठल रामचंद्र फडके, एम्. ए., एल्एल् बी., वकील ( रि. सि. जज्ज ) पुणें.

हिंदु स्त्री–पुरुषांच्या वारसा हक्कांत, मिळकतीवरील स्त्रियांच्या हक्कांत व मृत्युपत्र करण्याच्या हक्कांत झालेले क्रांतिकारक बदल सोप्या भाषेंत समजावून देणारें हें एकमेव पुस्तक प्रकाशकाकडे व सर्व प्रमुख पुस्तकविक्रेत्यांकडे विकत मिळेल. [ किंमत १। रुपया, शिवाय टपालखर्च ]

प्रकाशक : हे. वि. फडके, श्रीकृष्णकुंज, ८२० भां. इं. रोड, पुणें ४.

## शेतींत यंत्रांचा वापर केल्यानें उत्पन्न वाढतें काय ?

लेखक : श्री. पी. एन्. ड्रायव्हर,
इकॉनॉमिक्स या विषयाचे प्राध्यापक, शेतकी कॉलेज, पुणें.

शेतींत यंत्रांचा उपयोग केल्यानें पिकाचें उत्पन्न वाढूं शकतें किंवा कसें या प्रश्नाच्या बाबतींत बराच गोंधळ व शंका शेतकऱ्यांच्या मनांत आढळून येतात. या प्रश्नाचें निःसंदिग्ध उत्तर मिळणें आवश्यक आहे, कारण (१) आपण आतां वैयक्तिक शेतांवर यंत्रांचा उपयोग करूं लागलों आहोंत आणि त्याहूनहि महत्त्वाची गोष्ट म्हणजे, (२) सहकारी शेतींतील कांहीं कामें आपण यांत्रिक पद्धतीनें करूं लागण्याचा संभव आहे.

या बाबतींत गोंधळ वाटण्याचें प्रमुख कारण हें कीं, कांहीं छोट्या शेतांची उत्पादनक्षमता ही कांहीं मोठ्या शेतांच्या मानानें अधिक असते. याचीं जीं कारणें आहेत त्यांचा शेतीच्या यांत्रिकीकरणाशीं कांहीं संबंध नसल्यानें आपण आपल्या मनांत गोंधळ होऊं देतां कामा नये. शिवाय छोट्या शेताचे मालक हे पुष्कळ वेळां मोठ्या शेतांच्या मालकांपेक्षा खूपच अधिक मेहनत घेत असल्याचें आपण पाहतो व त्यामुळेंच मोठ्या शेतांपेक्षा छोट्या शेतांचें उत्पन्न अधिक असल्याचें दृश्य आपल्याला दिसून येतें.

आतां आपल्या मुख्य मुद्याकडे वळूं. आफ्रिकेमधील युरोपिअन लोकांच्या देखरेखीखालील शेती व चीनमधील स्थानिक लोकांच्या देखरेखीखालील शेती यांचा अनुभव पाहतां असें दिसून येतें कीं, हातानें चालविण्यांत येणाऱ्या अवजारांकडून आपण जनावरें आणि तेलें यांच्या साहाय्यानें चालविण्यांत येणाऱ्या यंत्राकडे जसजसे जातो तसतशी पिकांच्या एकरीं उत्पन्नांत अधिकाधिक वाढ होत असल्याचें आपल्याला दिसून येतें.

चीनमध्यें आज अनेक शेतांवर जुन्या धर्तीच्या नांगराऐवजीं जनावरांच्या साहाय्यानें ओढावयाचे नवे नांगर वापरण्यांत येऊं लागले आहेत. सोव्हियट रशियामध्यें सामुदायिक शेतांवर यंत्रांचा मोठ्या प्रमाणावर वापर करून उत्पन्न कसें वाढविण्यांत आलें आहे हें सर्वश्रुतच आहे. आफ्रिकेमध्यें ट्रॅक्टरच्या नांगरणीसंबंधीं सुद्धां हाच अनुभव आहे. चीन व सोव्हियट युनियनमधील यासंबंधीच्या माहितीवर कांहीं लोक राजकीय कारणांसाठीं विश्वास ठेवण्यास तयार नसतात. तथापि आफ्रिकन शेतीसंबंधीं हीच वस्तुस्थिति असल्याचें समजल्यावर त्यावर विश्वास न ठेवणें कठीणच आहे. आफ्रिकेंत गेनिअरि या छोट्या खेड्यांत युद्धोत्तर काळांत जे प्रयोग करण्यांत आले त्यावरून हाताच्या लागवडीपेक्षा ट्रॅक्टरच्या नांगरणीमुळें उत्पन्न पुष्कळच जास्त येतें, ही गोष्ट स्पष्टपणें सिद्ध झाली आहे. हाताच्या लागवडीनें भुईमुगाचें एकरीं उत्पन्न अवघें २२० रत्तल आलें तर ट्रॅक्टरचा उपयोग केल्यानें तें एकरीं १,१०० रत्तल आलें.

### महत्त्वाचा घटक

यांत्रिक लागवडीमुळें उत्पन्नांत वाढ होते त्याचीं नेमकीं कोणतीं कारणें आहेत हें शास्त्रज्ञांनीं शोधून काढलें आहे. तसेंच ही वाढ होण्यास इतर कांहीं कारणें असल्यास तीं त्यांनीं वेगळीं काढलीं आहेत. उदाहरणार्थ, यांत्रिक लागवडींत रासायनिक खतांचा वापर करावा लागत असल्यास उत्पन्नांतील वाढ ही यांत्रिक लागवडीमुळें नव्हे तर रासायनिक खतांमुळें झाली असल्याचा संभव आहे, असा युक्तिवाद करण्यांत येईल. तथापि या विशिष्ट प्रयोगाच्या बाबतींत उत्पन्नांत झालेली वाढ रासायनिक खताच्या वापरामुळें झाली नव्हती; कारण येथें या खतांनीं केवळ उत्पन्नांत वाढ होऊंच शकली नाहीं.

पिकाचें उत्पन्न ज्या गोष्टींवर अवलंबून असतें त्यांत प्रमुख म्हणजे रोपांची एकरीं संख्या ही होय हें निर्विवाद होय. यांत्रिक लागवड न करतां जेव्हां साध्या हातांनींच वरवर लागवड करण्यांत येते तेव्हां जमिनीच्या पृष्ठभागावरील कांहीं थोड्या इंच थरावरच क्रिया केली जाते. यांत एका विशिष्ट प्रमाणांतच रोपांची जास्तींत जास्त संख्या मिळूं शकेल. तथापि महत्त्वाची गोष्ट ही कीं रोपांची संख्या जास्त होऊन रोपें फार दाट झाल्यास एकूण उत्पन्नांत घट येते. याउलट, यांत्रिक लागवडींत रोपांची संख्या वाढवून सुद्धां उत्पन्नांत घट येत नाहीं. याचा अर्थ असा कीं यांत्रिक लागवडीच्या बाबतींत एकरीं जास्त रोपें ठेवून दर रोपामागें उत्पन्न वाढवितां येतें. या बाबतींतील प्रत्यक्ष प्रयोगाची माहिती द्यावयाची म्हणजे हातानें लागवड केलेल्या शेतांत जेवढी जास्तींत जास्त रोपें राहूं शकलीं त्याहून सुमारें चौपट रोपें यांत्रिक लागवडीखालील शेतांत राहूं शकली, पण पहिल्याच्या उत्पन्नापेक्षा दुसऱ्याचें उत्पन्न चौपटीनें नव्हें तर पांच पटीनें अधिक आलें.

खोल यांत्रिक लागवडीनें रोपांतील अंतर कमी ठेवूनहि उत्पन्न जास्त कसें येतें हें आपण पाहूं या. याचें एक कारण असें असावें कीं, यांत्रिक लागवडींत जमिनीच्या पोटांत खोल असलेलीं पोषण द्रव्यें रोपांना उपलब्ध होऊं शकतात. तसेंच त्याचें दुसरें एक कारण हें असावें कीं, अशा खोल नांगरणीमुळें रोपांच्या वाढीस सुरवातीच्या काळांतच त्यांचीं मुळें लवकर खोल जाऊं शकतात आणि त्यामुळें वरच्या भागांत मुळांची दाटी होण्याचें टळतें. तथापि अशा लागवडीच्या बाबतींत दीर्घकाळ रासायनिक खतें वापरलीं नाहींत तर उत्पन्नाचें वाढतें प्रमाण तसेंच कायम राहूं शकेल किंवा काय याबद्दल शंकाच आहे. यासाठीं दीर्घकाळ अनुभव घेतला पाहिजे. परंतु कांहीं वर्षें कां होईना, यांत्रिक लागवडीनें जास्त उत्पन्न मिळविणें फार फायद्याचें होतें.

—'शेतकरी', नोव्हेंबर, १९५६

### डायमंड ज्युबिली कॉटेज इंडस्ट्रीज् इन्स्टिटयूट, बडोदा

गरीब मजुरांच्या मुलांना धंदेशिक्षण मिळावें, बेकारांना प्रात्यक्षिक धंदेशिक्षण दिल्यास त्यांना स्वावलंबनानें धंदा सुरू करतां यावा या उद्देशानें या संस्थेची सुरवात १९३८ सालीं श्री. सयाजीराव महाराज (गायकवाड) यांच्या हीरकमहोत्सवाचे वेळीं झाली. सध्यां मुंबई सरकारच्या सहकारी खात्यामार्फत यांची व्यवस्था पाहिली जाते.

सुतार काम, लोहार काम, शिवण काम, जोडे बनविणें, कापड रंगविणें, खोदीव काम, इत्यादि ८ प्रकारचें धंदेशिक्षण येथें दिलें जातें. अभ्यासक्रम दोन वर्षांचा आहे. येथें तयार झालेला माल सहकारी दुकानामार्फत विकला जातो. लष्करी बूट येथें मोठ्या प्रमाणांत तयार करतांना दिसून आलें. सरकारच्या उत्तेजनामुळें पद्धतशीर रीतीनें धंदेशिक्षण दिलें जात आहे. साधारणतः १६ ते २५ वर्षें वयाच्या मुलांना येथें प्रवेश मिळतो. मुंबई राज्यांतील विद्यार्थ्यांना या शिक्षणक्रमासाठीं फी द्यावी लागत नाहीं. उलट, कांहीं शिष्यवृत्त्या विद्यार्थ्यांना मिळतात.

गरजू विद्यार्थ्यांनीं याचा अवश्य फायदा घ्यावा. अभ्यासक्रमाची सविस्तर माहिती वरील पत्त्यावर पत्र पाठवून मागवून घ्यावी.

## गुजरातमधील प्रमुख सहकारी संस्था

### ( लेखांक तिसरा )

लेखक : श्री. ल. का. कुलकर्णी, बी. ए.
C/o कोऑपरेटिव्ह ट्रेनिंग कॉलेज, पुणें १.

**५. पुस्तकालय साहाय्यक सहकारी मंडळ लि., बडोदा.**

या मंडळाची स्थापना दि. ३१-३-२४ रोजीं झाली. सांस्कृतिक, शैक्षणिक व सामाजिक बाबतींत बडोदा संस्थान नांवाजलेलें होतें. त्या संस्थानांतील हे मंडळ असल्यानें याची विशेष प्रगति झाल्यास नवल नाहीं. गुजरातमधील वाचनालयांचा विकास व पुस्तकांचा प्रसार करण्यासाठीं या मंडळानें आतांपर्यंत बहुमोल कार्य केलें आहे. घाऊक प्रमाणांत वाचनालयासाठीं पुस्तकें खरेदी करणें, नियतकालिकांची वर्गणी ( वाचनालयासाठीं ) भरणें, विद्यार्थ्यांना उपयुक्त ठरतील अशीं पुस्तकें प्रसिद्ध करणें, वाचनालयाची चळवळ सुरू ठेवणें व एकसूत्रीपणा आणणें, साक्षरताप्रसारासाठीं जरूर तें सहकार्य देणें, वाचनालयांच्या ठेवी स्वीकारणें, त्या रकमांची योग्य त्या ठिकाणीं गुंतवणूक करणें, इत्यादि कामें या मंडळाकडून केलीं जातात.

गुजरातमधील कोणाहि नागरिकास या मंडळाचें सभासद होतां येतें. शेअर २५ रु. चा असून प्रवेश फी एक रुपया आहे. त्याचप्रमाणें वाचनालयें, सहकारी सोसायटी व शैक्षणिक संस्था यांनाहि मंडळाचे सभासद होतां येतें. गेल्या सहकारी वर्षाचे अखेरीस २८८ व्यक्तिगत सभासद व ८५४ वाचनालयें मंडळाचे सभासद होते. अधिकृत भांडवल एक लाख रुपयांचें असून वसूल झालेलें भांडवल ६५,४२५ रु. आहे. रिझर्व्ह फंड रु. ४०,६०२ व इतर फंड रु. ६२,२९८ आहेत. शेअरवर शें. ६ टक्के डिव्हिडंड गतवर्षीं वांटण्यांत आलें. सुमारें १३५० वाचनालयांनीं आपल्या ठेवी ( रिझर्व्ह फंड ) या मंडळांत ठेवल्या आहेत. ठेवींची रकम रु. ४,११,५८४ आहे. यावर शेंकडा २ टक्के व्याज दिलें जातें. यावरून या भागांत वाचनालयांची संघटना व आर्थिक स्थिति किती चांगली आहे याची कल्पना येते. आपणांकडे खेडोपाडीं कोणी पुढाकार घेत नाहीं. वाचनाची आवड उत्पन्न करीत नाहीं. जनतेनें पुढाकार घेतला पाहिजे. सरकार करील तेवढ्यांतच समाधान मानूं नये. बडोद्यांतील या मंडळाचें उदाहरण इकडील लोकांनीं आदर्श मानून योग्य तीं पाउलें टाकलीं पाहिजेत.

मंडळाच्या कार्याचे आणखी कांहीं आंकडे पाहण्यासारखे आहेत. गतवर्षीं सुमारें रु. ८३,३१६ एवढी रकम नियतकालिकांच्या वर्गणीसाठीं भरण्यांत आली. रु. १,४६,०३२ किंमतीचीं पुस्तकें विकलीं व एकंदर उलाढाल रु. २,२९,३५० ची झाली.

मंडळानें आतांपर्यंत ६१ पुस्तकें प्रकाशित केलीं आहेत. दिवंगत व्यक्तींच्या नांवानें कांहीं रकमा मंडळाकडे आहेत. त्यांतून दरवर्षीं एक पुस्तक दिवंगत व्यक्तींच्या स्मरणार्थ प्रसिद्ध केलें जातें. आतांपर्यंत अशा प्रकारचीं १५ पुस्तकें प्रकाशित केलीं आहेत.

'पुस्तकालय' या नांवाचें एक मासिक मंडळ चालवितें. मंडळाच्या हालचाली, वाचनालयाचे अहवाल, त्यांना द्यावयाच्या सूचना, पत्रकें वगैरेंसाठीं या मासिकाचा फार उपयोग होतो.

मंडळाचें खेळतें भांडवल रु. ६,९३,११० असून गतवर्षीं रु. १४,०८५ निव्वळ नफा झाला.

हें मंडळ म्हणजे 'लायब्रीज कोऑपरेटिव्ह सोसायटी लि.' या नांवानें ओळखलें जातें. सबंध मुंबई राज्यांत या प्रकारचें हें एकच मंडळ आहे. कदाचित् भारतांत सहकारी तत्त्वावर चालणारें अशा प्रकारचें दुसरें मंडळ नसेल असें सांगण्यांत आलें. शिक्षण-प्रसाराच्या व वाचनालयाच्या वाढीसाठीं अशा प्रकारच्या मंडळाचा अतिशय उपयोग होईल. महाराष्ट्रांत अशा मंडळाची अत्यंत आवश्यकता आहे. कांहीं प्रमुख पुस्तकविक्रेत्यांनीं व प्रमुख वाचनालयांनीं आवश्यक तें सहकार्य केलें तर अशा प्रकारची संस्था आपणाला सुरू करतां येईल. सुज्ञांनीं याचा जरूर विचार करावा.

**६ बडोदा सहकारी लँड मॉर्गेज बँक लि., बडोदा**

'विना सहकार नाहीं उद्धार' असें या बँकेचें ध्येयवाक्य असून व बडोदा संस्थान मुंबई राज्यांत विलीन झालेलें असलें तरी अनेक प्रयत्न करूनहि या बँकेनें मुंबईराज्य को-ऑप. लँड मॉर्गेज बँकेशीं सहकार्य केलेलें नाहीं. वास्तविक मुंबई प्रॉव्हि. लँड मॉर्गेज बँकेशीं ही बँक संलग्न व्हावयास पाहिजे. परंतु या बँकेला स्वतःच वैशिष्ट्य टिकवावयाचें आहे. सहकारी क्षेत्रांत असला 'सवता सुभा' धरण्याचा हट्ट कां धरावा समजत नाहीं. असें असलें तरी बँकेचें कार्य वाखाणण्याजोगें आहे. आर्थिक स्थिति चांगली आहे.

बँकेचें वसूल भांडवल रु. २,४१,३२५ असून रिझर्व्ह फंड रु. २,२९,७३६ आहे. शेतांच्या व घरांच्या तारणावर सुमारें रु. १९,५४,००० कर्जाऊ देण्यांत आले. गतवर्षीं रु. ४२,५०७/- नफा बँकेला झाला आहे.

श्री. चतुरभाई नाथाभाई पटेल हे बँकेचे प्रमुख असून श्री. चीमणभाई मुळजीभाई अर्मान हे चिटणीस म्हणून काम पहातात.


**दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.**

शेड्यूल्ड बँक : मुख्य कचेरी-पुणें २.

भांडवल ( ३१-१०-५६ )

| | | |
|---|---|---|
| **वसूल भांडवल** | रु. | १६,००,००० |
| **गंगाजळी व इतर निधि** | रु. | ८,७५,००० |
| **खेळतें भांडवल** | रु. | ७ कोटींचे वर |

★ स्पेशल सेव्हिंग्ज डिपॉझिट योजना : व्याजाचा दर द. सा. द. शें. २

★ रु. १०,००० व त्यावरील रकमा तीन महिने अगर अधिक मुदतीसाठीं आकर्षक व्याजाचे दरानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दरासाठीं चौकशी करावी.

★ मराठवाडा व विदर्भांतील जनतेचे सोयीसाठीं औरंगाबाद, जालना व नांदेड आणि अकोला येथें नवीन शाखा उघडण्यांत आल्या आहेत.

★ हेड ऑफिस, डे. जिमखाना (पुणें), सोलापूर (फलटण गल्ली), नाशिक, अहमदनगर, श्रीरामपूर, किर्लोस्कर-वाडी व पनवेल येथें सेफ डिपॉझिट व्हॉल्टची सोय असून लॉकर्स उपलब्ध आहेत.

★ लेटर्स ऑफ क्रेडिट उघडली जातात.

चिं. वि. जोग,
मॅनेजर.


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.